मानवसेवा आरक्षणारनाची

हे बापरून नाहीत — कल्याण डोंबिवली महानगरपालिका कल्याण

क. ल. न. -३

दस्त क्र. ३८०० २०११

कल्याण डोंबिवली महानगरपालिका, कल्याण

दिनांक :- २३/०३/२०१०

श्री./~~श्रीमती~~ पांडुरंग नारायण मोरे

कुलमुखत्यारपत्रक :—श्री. ईश्वर एस. पटेल

वास्तुशिल्पकार:— श्री. जॉन नर्गिस (वास्तु) कल्याण

विषय:— ~~शि~~.सं.नं. ३ न २ स.नं. — हि.नं. — प्लॉट नं. —

मौजे— कचोरे येथे बांधकाम करण्याच्या मंजूरीबाबत.

संदर्भ:— १) आपला दि. २/२/१० रोजीचा श्री. जॉन नर्गिस वास्तु. कल्याण यांचे मार्फत सादर केलेला अर्ज क्र.

२) अंतरिम मंजुरी आदेशपत्र क्र. कडोंमपा/नरवि/बांप/कवि/ ८–६ दि. ३/६/०८

महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ४४ तसेच म.प्रा. व न.र. अधिनियम १९६६ चे कलम ४५ नुसार ~~शि~~.सं.नं. ३ न २ स.नं. — हि.नं. — प्लॉट नं. — मौजे— कचोरे मध्ये ३६६०.०० चौ.मी. क्षेत्राच्या भुखंडावर, ९५५.३० चौ.मी.चटई क्षेत्राच्या भुखंडाचा विकास करावयास मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९चे कलम २५३ अन्वये बांधकाम करण्यासाठी केलेल्या दिनांक २/२/१० च्या अर्जास अनुसरुन पुढील शर्तीस अधिन राहून तुमच्या मालकीच्या जागेत हिरव्या रंगाने दुरुस्ती दाखविल्याप्रमाणे ~~तळघर~~, ~~स्टील्ट~~, तळमजला, पाहिलो मजला, दुसरा मजला, तिसरा मजला, चौथा मजला, पाचवा मजला, सहावा मजला, सातवा मजला, आठवा मजला, नववा मजला, दहावा मजला, ~~अकरावा मजला~~, ~~बारावा मजला~~, ~~तेरावा मजला~~, रहिवासी, ~~दुकाने, ऑफिस, वाडे भितीच्या~~ इमारतीच्या बांधकामाबाबत, बांधकाम प्रारंभ प्रमाणपत्र देण्यात येत आहे. इमारतीच्या व जागेच्या मालकी हक्कासंदर्भात कुठलाही वाद निर्माण झाल्यास त्याला सर्वस्वी आपण जबाबदार रहाल या अटीवर हे संमतीपत्र देण्यात येत आहे.

~~विंग~~ A व B — तळ + १० मजले (रहिवास) (तळमजला कडोंमपासाठी)

१) हे बांधकाम प्रारंभ प्रमाणपत्र दिल्याचे तारखेपासून एक वर्षापर्यंत वैध असेल, नंतर पुढील ... नूतनीकरण मुदत संपण्याआधी करणे आवश्यक आहे. नूतनीकरण करताना किंवा नवी... अस्तित्वात आलेल्या नियमांच्या व नियोजित विकास योजने अनुषंगाने छाननी कर...

२) नकाशात हिरव्या रंगाने केलेल्या दुरूस्त्या आपल्यावर बंधनकारक राहतील.

३) बांधकाम चालू करण्यापूर्वी सात दिवस आधी महापालिका कार्यालयास लेखी कळविण्यात यावे.

४) ही परवानगी आपल्या मालकीच्या कब्जातील जमीनीव्यतिरिक्त अन्य जमीनीवर ... अगर विकास करण्यास हक्क देत नाही.

५) इमारतीचे बांधकाम या सोबतच्या मंजूर केलेल्या नकाशांप्रमाणे आणि घालून दिलेल्या अटीप्रमाणे करता येईल.

६) वाडेभिंत व जोत्याचे बांधकाम झाल्यानंतर वास्तुशिल्पकाराचे, मंजूर नकाशाप्रमाणे वाडेभिंत व जोत्याचे बांधकाम केल्याबाबतचे प्रमाणपत्र महानगरपालिकेस सादर करण्यात यावे, व ते या कार्यालयाकडून तपासून घेऊन "जोता पूर्णत्वाचा दाखला" घेण्यात यावा व त्यानंतरच पुढील बांधकाम करण्यात यावे.

७) सदर अभिन्यासात कोणत्याही प्रकारचा फेरफार पूर्व परवानगी घेतल्याशिवाय करू नये, तसे केल्याचे आढळून आल्यास सदरचे बांधकाम प्रारंभ प्रमाणपत्र रद्द झाले असे समजण्यात येईल.

८) इमारतीच्या बांधकामाच्या सुरक्षिततेची (स्ट्रक्चरल सेफटी) जबाबदारी सर्वस्वी आपले वास्तुशिल्पकार व स्थापत्य विशारद यांचेवर राहिल.

९) नकाशांत दाखविलेल्या गाळयांच्या संख्येमध्ये व नियोजनामध्ये पूर्वपरवानगीशिवाय बदल करू नये.तसेच प्लॉटच्या हददीत इमारती भोवती मोकळया सोडावयाच्या जागेत बदल करू नये व त्यामध्ये कोणत्याही प्रकारचे बांधकाम करू नये.

१०) नागरी जमीन कमाल मर्यादा अधिनियम १९७६ मधील तरतूदी प्रमाणे जागा बाधित होत असल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी आपलेवर राहिल.

११) भूखंडाकडे जाण्या—येण्याच्या मार्गाची जबाबदारी संपूर्णपणे आपलेकडे राहिल.बांधकाम प्रारंभ प्रमाणपत्र नियोजित रस्त्याप्रमाणे दिले असल्यास त्या रस्त्याचे काम महानगरपालिकेच्या सोयी प्रमाणे व प्राधान्याप्रमाणे केले जाईल व तसा रस्ता होईपर्यंत इमारतीकडे जाणाच्या येणाच्या मार्गाची जबाबदारी सर्वस्वी आपली राहिल.

१२) जागेत जूने भाडेकरु असल्यास त्यांच्याबाबत योग्य ती व्यवस्था करावयाची जबाबदारी मालकाची राहिल व मालक भाडेकरु यामध्ये काही वाद असल्यास किंवा निर्माण झाल्यास त्याचे निराकरण मालकाने करणे आवश्यक राहिल.

१३) सदर जागेत विहीर असल्यास ती संबंधित विभागाच्या परवानगी शिवाय बुजवू नये.

१४) सदर जागेतून पाण्याचा नैसर्गिक निचरा होत असल्यास तो जलनि:सारण विभाग, (क.डों.म.पा.)च्या परवानगीशिवाय वळवू ...